महात्मा गांधी विद्यामंदिर संचालित

**लोकनेते व्यंकटराव हिरे कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय**

पंचवटी नाशिक - ४२२००३

पुणे विद्यापीठ संलग्न क्र पी.यू./एन.एस/ए.एस.सी/०१८(१९७९)

(NAAC Reaccredited at **'A'** Level with CGPA 3.01)

कार्यालय: २५१२९५४ , २६२८२३३ फॅक्स ( २५३) २५१२९२४

Web site : www.lvhcollege.com * E-mail: lvhcollege@gmail.com,

उत्कृष्ट संलग्न महाविद्यालय पुरस्कार २०१७, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

Founder



Karmaveer
Bhausaheb Hiray

दिनांक १४/०३/२०१७

# ग्रंथालय वार्षिक अहवाल २०१६-१७

ग्रंथालय हा महाविद्यालयाचा आत्मा असून महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी उत्कृष्ट ग्रंथालय उपलब्ध आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, सामाजिक गरजा लक्षात घेऊन संस्कृती विषयक विचार कसे प्रगल्भ होतील याकडे विषेश लक्ष दिले जाते. त्यासाठी दर्जेदार वाचन साहित्य संदर्भग्रंथ, शब्दकोश, ज्ञानकोश, ग्रंथालयातील पुस्तकांबरोबरच मासिके नियतकालिके आणि जर्नल्सही आहेत. तसेच स्पर्धा परीक्षा पुस्तकांचा स्वतंत्र विभाग आहे. बदलत्या काळानुसार ई जर्नल्स ई पुस्तके देखील उपलब्ध आहेत. गरीब विद्यार्थ्यांसाठी बुक बँक सुविधा दिली जाते. मुला मुलींसाठी वेगळी अशी वाचन व्यवस्था आहे. दरवर्षी ग्रंथालयात पुस्तकांचे प्रदर्शन भरविले जाते. ई रीडिंग लायब्ररी इन्शुरन्स आंतर ग्रंथालय देवघेव सेवा ग्रंथालयात उपलब्ध आहेत.

**ग्रंथालयात उपलब्ध असलेल्या वाचन साहित्याचा तपशिल.**

| अ.नं. | विवरण | मागील ग्रंथांची संख्या | चालू वर्षातील वाढ | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | विकत घेतलेली ग्रंथ | | | |
| | १.वरिष्ठ विभाग | ४६३२९ | **५९८** | ४६९२७ |
| | २. वरिष्ठ पी.बी.एफ. | ६४३१ | **२९२** | ६७२३ |
| | ३.कनिष्ठ विभाग | १२९६४ | **१२५१** | १४२१५ |
| | ४. कनिष्ठ पी.बी.एफ.. | ४२८५ | **५७४** | ४८५९ |
| | ५.व्यवसाय शिक्षण विभाग आणि इतर | १०७०१ | ७२ | १०७७३ |
| | ग्रंथसंख्या | **८०७१०** | **२७८७** | **८३४९७** |
| २ | प्रबंध व लघुप्रबंध | ०४ | १ | ०५ |
| ३ | नियतकालिकांचे बांधीव खंड | ५५७ | - | ५५७ |
| ४ | सीडी व डीव्हीडी | २४० | - | २४० |
| | एकूण | **८०१** | **०१** | **८०२** |
| ५ | रद्दबातल ग्रंथसंख्या<br>१. वरिष्ठ विभाग<br>२. वरिष्ठ पी.बी.एफ.<br>३. कनिष्ठ विभाग<br>४. कनिष्ठ पी.बी.एफ..<br>५. व्यवसाय शिक्षण विभाग आणि इतर | ४१६१<br>१४६८<br>३४९९<br>२८२४<br>०२ | -<br>-<br>-<br>-<br>- | ४१६१<br>१४६८<br>३४९९<br>२८२४<br>०२ |
| ६ | इतर (बुक बँक/ गुणवत्ता विकास / कनिष्ठ एस. अे. एफ./ वरिष्ठ एस. अे. एफ./ एम. एस.डब्लू / | | - | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | के.बी.एच.इजिनि./ व्यवसाय शिक्षण मार्गदर्शन कोर्स ) | ६४५५ | - | ६४५५ |
| | एकूण | **१८४०९** | **-** | **१८४०९** |
| ग्रंथालयात उपलब्ध असलेल्या ग्रंथांची संख्या | | **६५०८८** | | |
| ७ | नियतकालिके<br>१. वर्गणीतून खरेदी केलेली<br>२.ई-जर्नल्स<br>३. ई-बुक्स | <br>१०२<br>२१००<br>५१००० | <br>०३<br>३९००<br>४६००० | <br>१०५<br>६०००<br>९७००० |

**ग्रंथालयातील सभासद संख्या**

| अ.नं. | ग्रंथालयातील सभासद संख्या | विद्यार्थी | शिक्षक | |
|---|---|---|---|---|
| १ | वरिष्ठ विभाग ( अनुदानित आणि विनाअनुदानित) | २९५८ | ७२ | |
| २ | वरिष्ठ विभाग (विनाअनुदानित) पदव्युत्तर सत्र | ७४८ | | |
| ३ | कनिष्ठ विभाग ( अनुदानित आणि विनाअनुदानित) | १७९८ | २४ | |
| | व्यवसाय शिक्षण विभाग | २२८ | ०६ | |
| ४ | शिक्षकेत्तर कार्मचारी( अनुदानित आणि विनाअनुदानित) | | ६२ | |
| | **ग्रंथालयातील एकूण सभासद संख्या** | ५७३२ | १६४ | **५८९६** |

**माहिती साक्षरतेचा उपक्रम :** कोणत्याही संशोधनाचा पाया माहिती हाच असतो. माहितीमध्ये एक सामर्थ्य असते आणि म्हणूनच आर्थिक, वैचारिक अशा सर्व पातळयावरून माहितीचे संग्रहण केले जाते. अशा माहितीच्या बाबतीत चौकस असणे, साक्षर असणे गरजेचे झाले आहे. ही माहिती विविध मार्गांनी व विविध रुपात मुबलक उपलब्ध होत असते. त्या उद्देशाने महाविद्यालयाचा विद्यार्थी माहिती साक्षर व्हावा यासाठी ग्रंथालयात डॉ. एस. आर. रंगनाथन आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जन्मदिनी ग्रंथप्रदर्शन भरविण्यात आले.

**इंटरनेट सेवा :** ग्रंथालय विभागात १० संगणकासह इंटरनेट सुविधा असलेली सुसज्ज प्रयोगशाळा ई-रिसोर्स च्या वापरासाठी महाविद्यालयातील विद्यार्थी संशोधक व प्राध्यापक लाभ घेतात.

**पी.बी.एफ.:** आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यासाठी ग्रंथपेढी पी.बी.एफ. या योजने अंतर्गत ७७९७०.०० रू. किमतीचे सुमारे ३३१ ग्रंथ खरेदी करण्यात आले. या योजनेतील ८५ विद्यार्थ्यांना ३०० पुस्तके वर्षभर घरी अभ्यासासाठी देण्यात आली.

**स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र** : महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागातून शैक्षणिक वर्षात स्पर्धा परीक्षेची ५५८ पुस्तके विद्यार्थ्यांना वर्षभरासाठी पुस्तके देण्यात आली. १८६ विद्यार्थ्यांनी त्याचा लाभ घेतला.

**नियतकालिके :** विविध विषयावरील ग्रंथसंख्या हे जसे ग्रंथालयातील महत्वाचे अंग आहे. त्याच प्रमाणे नियातकालिके सुद्धा ग्रंथालायाचे महत्वाचे अंग आहे. नियातकालीके हा ताज्या माहितीचा प्रवाह असतो. त्यामध्ये आद्ययावत माहिती मिळते. ही माहिती आमच्या विद्यार्थी व शिक्षकांना मिळावी म्हणून ग्रंथालयात वेगवेगळ्या विषयावरील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील इंग्रजी, मराठी व हिंदी भाषेतील एकूण ९८ नियतकालिके आणि जर्नल्स खरेदी केली जातात. शैक्षणिक वर्षात ६००० ऑनलाईन ई-जर्नल्स आणि ३०००००० ई-बुक्स चे दरवर्षी नूतनीकरण करून ग्रंथालय सभासदांना उपलब्द करून देण्यात येते. प्रिंट आणि ई-जर्नल्स आणि ई-बुक्स ई. करिता वर्षभरासाठी वार्षिक वर्गणी स्वरूपात वर्गणी पाठवली जाते.

**दैनिक :** शिक्षक व विद्यार्थी यांना दररोजच्या घडामोडीची माहिती मिळावी या करिता मराठी, इंग्रजी आणि हिदी भाषेतील २० दैनिक वर्तमान पेपर ग्रंथालय विभागात उपलब्ध करून देण्यात आली. त्यासाठी दरमहा रु. २५०० (दोन हजार पाचशे रुपये) एवढा खर्च केला जातो.

**झेरॉक्स सेवा** : संशोधक विद्यार्थी व महाविद्यालयीन कर्मचारी यांच्या मागणी नुसार संदर्भग्रंथ तसेच नियतकालिकातील मजकूराच्या प्रतिलिपी काढून दिल्या जातात.

**कात्रण सेवा** : महाविद्यालयाची प्रतिमा अधिक स्पष्ट होण्यासाठी महाविद्यालय ग्रंथालयाने विविध दैनिकातून महाविद्यालया संबधी येणाऱ्या बातम्यांचे कात्रण सर्वांसाठी वाचावयास उपलब्ध करून दिले आहे.

**फेसबुक सेवा / वाट्सअप** : सोशल नेट्वर्किंग च्या माध्यमातून महाविद्यालात विविध शैक्षणिक उपक्रम आयोजित केली जातात. त्या सर्व उपक्रमाची माहिती व माहितीविषयक बातमी महाविद्यालायाच्या सोशल नेट्वर्किंग च्या माध्यमातून फेसबुकवर आणि **वाट्सअप वर** अपलोड केली जाते. जेणेकरून महाविद्यायालयाची प्रतिमा अधिक स्पष्ट होण्यास मदत होते.

**आंतर ग्रंथालयीन देवघेव सेवा :** महाविद्यालायातील विद्यार्थी व प्राध्यापकांना आपल्या विषयासंबधी पुस्तक ग्रंथालयात उपलब्द नसेल अशा वेळी खालील ग्रंथालयाचे सभासदत्व घेण्यात आले आहे.

१. डेलनेट (डेव्हलोपिंग लायब्ररी नेटवर्क ) चे सभासद, दिल्ली.

२. महात्मा गांधी विद्यामंदीर फार्मसी महाविद्यालय, नाशिक

३. महात्मा गांधी विद्यामंदीर मैनेजमेंट इन्स्ठिटयुट, मुंबई आग्रा रोड पंचवटी नाशिक

**ग्रंथालयाची सुरक्षितता** : ग्रंथालय विभागतील साहित्य सुरकक्षेच्या दृष्टीने ग्रंथालय बिभागाचा ६२००००० रू. बासस्ट लाख( बासस्ट लाख रुपये) चा विमाचे नूतनीकरण करण्यासाठी वार्षिक प्रीमियम ३००० रू. खर्च करण्यात आली.

**समाज कल्याण विभाग :** जिल्हा माहिती कार्यालय, नाशिक यांच्या मार्फत महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष २०१५-१६ या वर्षातील अनुसूचित जातीच्या ९२ विद्यार्थ्यांना लोकराज्य मासिकाचे दर महा मोफत वितरण करण्यात आले.

उद्देश :१) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांच्या योजनांची प्रसिद्धी व्हावी.

२) अनुसूचित जातीच्या सुशिक्षित बेरोजगार विद्यार्थ्यांना ( युवकांना) स्पर्धा परीक्षेसाठी लोकराज्य मासिकाचे मोफत वितरण.

**देणगी निधी :** मा. बाबा आमटे व आनंदवनाचे कार्य निश्चितच गौरवास्पद असून भावी तरुण पिढीकरिता/ विद्यार्थ्यानाकरिता प्रेरणादायी असेच आहे. आयुष्यभर समाजसेवेकरिता झटणारे व्रतस्थ बाबा आमटे यांच्या कार्याचा परिचय करून देणारे पुस्तक आमच्या महाविद्यालयातील शिक्षक व विद्यार्थ्यांकरिता आनंदवन या पवित्र ग्रंथाच्या चार प्रती डॉ. मुकुंद कुलकर्णी यांनी भेट दिल्या. तसेच महाविद्यालयात कार्यरत विविध शाखेचे विभागप्रमुख व प्राध्यापकांनी आमच्या महाविद्यालय ग्रंथालयाला वाढदिवसाचे औचित्य साधून ग्रंथ भेट स्वरूपात दिलीत. त्यांचा महाविद्यालयात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना भावी आयुष्याची दिशा देण्याकरिता निश्चितच उपयोग होईल. तसेच केंद्रीय हिंदी निदेशालय, मानव संसाधन विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांच्याकडूनही ग्रंथालयाला हिंदी विषयावरची १६९ छोटी-मोठी पुस्तके भेट स्वरूपात प्राप्त झाली आहेत. आपणा सर्वांचे महाविद्यालयाच्या वतीने व ग्रंथालय विभागाच्या वतीने शतशः आभार!

| अं.न. | वाढदिवसानिमित्त ग्रंथ भेट दिलेल्या मान्यवर व्यक्तींची नावे | एकूण किमंतीचे ग्रंथ |
|---|---|---|
| १ | प्राचार्य डॉ. बापूसाहेब सोनू जगदाळे | २५००/- |
| २ | डॉ. किरण नामदेव पिंगळे | २५००/- |
| ३ | डॉ. शशिकांत भरतराव शिसोदे | २०००/- |
| ४ | डॉ. मृणाल अश्विनकुमार भारद्वाज | २०००/- |
| ५ | डॉ. मुकुंद कुलकर्णी | १०००/- |
| ६ | प्रा. सुरेखा माळूदे | १५००/- |
| ७ | प्रा. सचिन सोनवणे | १०००/- |
| ८ | प्रा. उज्वल बच्छाव | १०००/- |
| ९ | प्रा. सी. एन. हिरे | १५००/- |
| १० | प्रा. एन. जी. पाटील | २००१/- |
| ११ | प्रा. डॉ. अनिल कठारे | १०००/- |
| १२ | प्रा. सागर जगताप | १२००/- |

**आभार :** महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागातील सेवा व सुविधा समृद्ध व अद्ययावत करण्यासाठी संस्थेचे विशवस्त व अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य मा. बापूसाहेब जगदाळे व ग्रंथालय समितीचे सदस्य व माझे

सर्व सहकारी आणि विद्यार्थी यांच्या सर्वांच्या मार्गदर्शनामुळे व सहकार्याने ग्रंथालयाची प्रगती होत आहे. मनापासून सर्वांचे आभार व्यक्त करतो.

Achievements:

Mr. Sambhaji P. Vyalij

1) Attended Two Days State Level Workshop on "**Design and Development of Institutional Repository using DSpace"** held at KTHM College, Nashik 3rd & 4th December 2016.
2) Attended Two day State Level Seminar Attended on "**Trends, Challenges and Future of Library and Information Science Profession**" held at K.P.G. Arts, Commerce and Science College, Igatpuri, Nashik on 15th- 16th December 2016.
3) Attended Two day State Level Workshop Attended on "**Research Methodology**" held at Dr. Moonje Institute of Management \and Computer Studies, Nashik on 3rd - 4th Febeuary 2017.

ग्रंथालय विभाग प्रमुख

ग्रंथालय समिती

| | |
|---|---|
| १. प्राचार्य डॉ. बापूसाहेब एस. जगदाळे | अध्यक्ष |
| २. उपप्राचार्या डॉ. एम. अे. भारद्वाज | सदस्य |
| ३. डॉ. टी. आर. महाले | सदस्य |
| ४. डॉ. एस. एम. पवार | सदस्य |
| ५. डॉ. आर. एस. पाटील | सदस्य |
| ६. डॉ. के. एन. पिंगळे | सदस्य |
| ७. प्रा. एस. पी. व्याळीज | सचिव |
| ८.श्री . एम. पी. कदम | सदस्य |




शैक्षणिक वर्ष २०१६-१७ साठी 'उत्कृष्ट महाविद्यालय' पुरस्कारासाठी सा.फु. पुणे विद्यापीठ समितीची महाविद्यालय ग्रंथालय विभागाला भेट. याप्रसंगी समिती अध्यक्ष डॉ. एस. जी. ताकवले यांच्या समवेत समिती सदस्य डॉ. अशोक चासकर प्राचार्य डॉ बापूसाहेब जगदाळे ग्रंथपाल प्रा. एस. पी. व्याळीज आदिसह मान्यवर.



ग्रंथालय विभागाला सदिच्छा भेटी दरम्यान मा. डॉ. धनराज माने (संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य) यांच्या समवेत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बापूसाहेब एस. जगदाळे, उपप्राचार्या डॉ. मृणाल भारद्वाज, विभाग प्रमुख डॉ. टी. आर. महाले आदि सह ग्रंथालय कर्मचारी.



लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालयात भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना प्राचार्य डॉं. बापूसाहेब एस. जगदाळे यांच्या समवेत उपप्राचार्या डॉ. मृणाल भारद्वाज, ग्रंथालय विभाग प्रमुख प्रा. संभाजी पी. व्याळीज प्रा. डॉ. मीनाक्षी पाटील ग्रंथालय सेवक आदीसह विद्यार्थी.




ग्रंथालय आणि माहितीशास्राचे जनक यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त विचार व्यक्त करताना महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. मृणाल भारद्वाज या प्रसंगी महाविद्यालयचे ग्रंथपाल प्रा. एस. पी. व्याळीज, डॉ. किरण पिंगळे, डॉ. विनीत रकिबे, उप ग्रंथपाल श्री एम. पी. कदम व ग्रंथालय कर्मचारी व आदि मान्यवर विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते





ग्रंथालय आणि माहितीशास्राचे जनक यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त पद्मश्री डॉ. एस. आर. रंगनाथन यांचे जन्म दिनाचे औचित्य साधून ग्रंथप्रदर्शन भरविण्यात आले त्याप्रसंगी महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. मृणाल भारद्वाज समवेत महाविद्यालयचे ग्रंथपाल प्रा. एस. पी. व्याळीज, डॉ. किरण पिंगळे, डॉ. विनीत रकिबे, व ग्रंथालय कर्मचारी व विद्यार्थी.





**ग्रंथालय विभाग:** विभागाच्या वतीने भारतीय घटनेचे शिल्पकार महामानव भारत रत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित असलेली लिखित ग्रंथ व मान्यवर लेखकांनी संपादित केलेली सहित्य संपदेचे ग्रंथप्रदर्शन भरविण्यात आले. या प्रसंगी ग्रंथांचे निरीक्षण करतांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बापूसाहेब जगदाळे समवेत शिक्षक, विद्यार्थी, आणि शिक्षककेत्तर वर्ग

---

**प्रसिद्धी समिती :**

शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये प्रसिद्धी समितीने महाविद्यालया संदर्भात वर्ष भरात झालेल्या विविध उपक्रमांच्या बातम्या विविध वर्तमानपत्रातून प्रसिद्धी दिली. असुन त्या संदर्भातील काही बातम्या आपल्या अवलोकनार्थ जोडलेल्या आहेत.

प्रा. एस .पी. व्याळीज

# हिरे महाविद्यालयास उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार प्रदान




कायनेटिक ग्रुपचे अध्यक्ष अरुण फिरोदिया व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. वासुदेव गाडे यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना डॉ. अपूर्व हिरे, प्राचार्य डॉ. बापूसाहेब जगदाळे आदी.

**पंचवटी** - लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालयास सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे कायनेटिक ग्रुपचे अध्यक्ष अरुण फिरोदिया यांच्या हस्ते व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. वासुदेव गाडे यांच्या अध्यक्षतेखाली उत्कृष्ट महाविद्यालयाचा पुरस्कार शुक्रवारी पुणे येथे प्रदान करण्यात आला. एक लाख पन्नास हजार रुपये, स्मृतिचिन्ह आणि प्रमाणपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

शैक्षणिक क्षेत्रात अतिशय मानाचा समजला जाणाऱ्याा उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्काराचे वितरण पुणे येथे करण्यात आले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा पुरस्कार पुणे, नाशिक व अहमदनगर या जिल्ह्यातील शहरी आणि महानगरपालिका क्षेत्रातील महाविद्यालयांमधून करण्यात येते. सन १९५२ मध्ये कर्मवीर भाऊसाहेब हिरे यांनी महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेची मुहूर्तमेढ रोवली. आज पाच हजारपेक्षा जास्त विद्यार्थी या संस्थेत शिक्षण घेत आहेत. आजवर संस्थेच्या विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रांत प्रावीण्य मिळवले आहे. या वाटचालीत संस्थेस मानाचा पुरस्कार मिळाल्याने सर्वच क्षेत्रातून अभिनंदन होत आहे. पुणे येथील विद्यापीठाच्या आवारात भव्य समारंभात या पुरस्काराचे वितरण करण्यात आले. यावेळी संस्थेचे समन्वयक आ. डॉ. अपूर्व हिरे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बापूसाहेब जगदाळे, उपप्राचार्या डॉ. मृणाल भारद्वाज, विज्ञान शाखाप्रमुख डॉ. टी. आर. महाले, प्रा. प्रकाश झाल्से उपस्थित होते.

## प्रा. डॉ. भल्ला यांना आदर्श शिक्षक पुरस्कार

पुणे येथील या समारंभात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा आदर्श शिक्षक पुरस्कार लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालयाच्या प्रा. डॉ. रेशम भल्ला यांना प्रदान करण्यात आला. त्यांच्या या यशाबद्दल डॉ.भल्ला यांचे शिक्षण क्षेत्रातून अभिनंदन होत आहे.




नाशिक : कायनेटिक ग्रुपचे अध्यक्ष अरुण फिरोदिया व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. वासुदेव गाडे यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना आमदार डॉ. अपूर्व हिरे. शेजारी प्राचार्य डॉ. बापूसाहेब जगदाळे, डॉ. मृणाल भारद्वाज, डॉ. टी. आर. महाले, प्रा. प्रकाश झाल्से आदी.

# हिरे महाविद्यालयाचा विद्यापीठातर्फे गौरव

## पुण्यातील सोहळ्यात डॉ. अपूर्व हिरे यांनी स्वीकारला पुरस्कार

**सकाळ वृत्तसेवा**

पंचवटी, ता. १२ : महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित लोकनेते व्यंकटराव हिरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयास सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे कायनेटिक ग्रुपचे अध्यक्ष अरुण फिरोदिया यांच्या हस्ते विद्यापीठाच्या वर्धापनदिनी 'उत्कृष्ट महाविद्यालय' पुरस्कार प्रदान करण्यात आला. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. वासुदेव गाडे अध्यक्षस्थानी होते.

मानाच्या या पुरस्काराचे एक लाख ५० हजार, स्मृतिचिन्ह आणि प्रमाणपत्र असे स्वरूप आहे.

संस्थेचे समन्वयक आमदार डॉ. अपूर्व हिरे यांनी पुण्यात नुकताच हा पुरस्कार स्वीकारला. या वेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बापूसाहेब जगदाळे, उपप्राचार्या डॉ. मृणाल भारद्वाज, विज्ञान शाखाप्रमुख डॉ. टी. आर. महाले, प्रा. प्रकाश झाल्से आदी उपस्थित होते. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा आदर्श शिक्षक पुरस्कारही लोकनेते व्यंकटराव हिरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या प्रा. डॉ. रेशम भल्ला यांना प्रदान करण्यात आला. संस्था संचालित मसगा महाविद्यालय, मालेगावचे कार्यालयीन अधीक्षक श्री. कट्यारे यांना आदर्श शिक्षकेतर कर्मचारी पुरस्कार प्रदान करण्यात आला. महाविद्यालयाला पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल संस्थेच्या अध्यक्षा पुष्पाताई हिरे, सरचिटणीस डॉ. प्रशांत हिरे, स्मिताताई हिरे, उपाध्यक्ष वी. के. देवरे, समन्वयक डॉ. अद्वय हिरे, सहसचिव डॉ. व्ही. एस. मोरे आदींनी आनंद व्यक्त करीत संबंधितांचे अभिनंदन केले.




महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेने आयोजित केलेल्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ दुसऱ्या पदवीग्रहण समारंभाप्रसंगी भूपेंद्र पंड्या, डॉ. प्रशांत हिरे, डॉ. अपूर्व हिरे, डॉ. व्ही. एस. मोरे, प्राचार्य डॉ. जगदाळे व विद्यार्थी.

# ध्येयनिश्चिती व योग्य नियोजन हेच यशाचे खरे गमक : पंड्या

## एमजीव्ही संस्थेचा द्वितीय पदवीदान सोहळा उत्साहात

प्रतिनिधी | नाशिक

खरे धर्माचरण म्हणजे कर्मकांड नसून आपल्या कर्तव्याचे चोख पालन करणे होय आणि विद्यार्थिदशेतील खरे धर्माचरण म्हणजे निष्ठेने अभ्यास करणे. ध्येयनिश्चिती आणि यशप्राप्तीसाठी योग्य नियोजन हेच यशाचे गमक असल्याचे प्रतिपादन भूपेंद्रभाई पंड्या यांनी केले.

महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेने आयोजित केलेल्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ दुसऱ्या पदवीग्रहण समारंभाप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. प्रशांत हिरे होते. याप्रसंगी महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेच्या नाशिक जिल्ह्यातील कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, फार्मसी, हॉटेल मॅनेजमेंट, मॅनेजमेन्ट ॲण्ड कॉम्पुटर सायन्स, इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड रिसर्च आणि शिक्षणशास्त्र महाविद्यालय अशा विविध महाविद्यालयातील ७९४ विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पदवी प्रदान करण्यात आली. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना पंड्याजी त्यांनी सक्सेस (Success) या इंग्रजी समर्पक शब्दाचे वर्णन करून यशाची परिपूर्ण व्याख्या सांगितली. ध्येयनिश्चिती, ध्येयावरील विश्वास, वैचारिक स्पष्टता, सातत्य, कार्यक्षमता, आणि समाधान आदी समग्र गोष्टी मिळून यश मिळते आणि त्याची प्राप्ती हेच विद्यार्थिदशेतील खरे धर्माचरण आहे, हे नमूद केले. याप्रसंगी तरुण मनावर असलेल्या मोबाइलचा प्रभाव व त्याचे दुष्परिणाम सांगून त्यापासून मुक्तता मिळविण्याचा मंत्रही विद्यार्थ्यांना दिला.

स्वागत व प्रास्ताविक सहसचिव डॉ. व्ही. एस. मोरे यांनी केले. डॉ. अपूर्व हिरे यांनी आभार मानले. सूत्रसंचालन प्रा. मीनाक्षी पाटील यांनी केले. बी. के. देवरे, डॉ. चंद्रशेखर पवार, प्राचार्य डॉ. बापूसाहेब जगदाळे, प्राचार्य डॉ. संतोष तांबे, विश्वस्त राजेश शिंदे, सुजाता शिंदे, श्याम भंडारी, उपप्राचार्या डॉ. मृणाल भारद्वाज, प्रा. दीप्ती भुतडा आदी मान्यवरांसह पदाधिकारी, विविध महाविद्यालयांतील प्राचार्य, उपप्राचार्य, विभागप्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# ध्येय निश्चिती व योग्य नियोजन हेच यशाचे गमक

## पू. भूपेंद्रभाई पंड्या यांचे प्रतिपादन



लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालयात संस्थेच्या दुसऱ्या पदवी प्रदान समारंभप्रसंगी पूज्य श्री. श्री. भूपेन्द्रभाई पंड्या, डॉ. प्रशांत हिरे यांच्यासह मान्यवर.

**पंचवटी-** ध्येय निश्चिती आणि यशप्राप्तीसाठी योग्य नियोजन हेच यशाचे गमक असून, खरे धर्माचरण म्हणजे कर्मकांड नसून आपल्या कर्तव्याचे चोख पालन करणे होय. देशातील विद्यार्थी धर्माचरणाचे खरे पालनकर्ते असल्याने त्यांनी निष्ठेने अभ्यास करणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन पू.श्रीश्री भूपेन्द्रभाई पंड्या यांनी केले.

येथील लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालयात नुकतेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या दुसऱ्या पदवीदान समारंभप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून पूज्य श्री श्री भूपेंद्रभाई पंड्या बोलत होते. यावेळी ७९४ विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पदवी बहाल करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात मिरवणुकीने झाली. मिरवणुकीचे आगमन झाल्यानंतर दीप प्रज्वलन व विद्यापीठ गीताने उद्‌घाटन झाले.

ध्येय निश्चिती, ध्येयावरील विश्वास, वैचारिक स्पष्टता, सातत्य, कार्यक्षमता आणि समाधान यामुळे यश मिळत असल्याचे पंड्या यांनी पुढे सांगितले. याप्रसंगी महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेच्या नाशिक जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांतील ७९४ विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पदवी प्रदान करण्यात आल्या. यावेळी व्यासपीठावर डॉ. प्रशांत हिरे, बी. के. देवरे, डॉ. व्ही. एस. मोरे, डॉ. अपूर्व हिरे, डॉ. चंद्रशेखर पवार, प्राचार्य डॉ. बापूसाहेब जगदाळे, प्राचार्य डॉ. संतोष तांबे, विश्वस्त राजेश शिंदे, सुजाता शिंदे, श्याम भंडारी, उपप्राचार्या डॉ. मृणाल भारद्वाज आदींसह विद्यार्थी उपस्थित होते. डॉ. व्ही. एस. मोरे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. मीनाक्षी पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

# शाश्वत शेतीसाठी मधक्रांतीची गरज

म. टा. वृत्तसेवा, [illegible]



डॉ. टी. बी. निकम यांचे प्रतिपादन

[illegible]

■ प्रात्यक्षिकांद्वारे माहिती

[illegible]



# हिरे कॉलेजात आरोग्य शिबिर

म. टा. प्रतिनिधी, नाशिक

लोकनेते व्यंकटराव हिरे कॉलेज आणि निओ प्रेरणा सेवाभावी संस्था यांच्या वतीने जागतिक महिलादिनानिमित्त विद्यार्थिनींसाठी मोफत भव्य आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

संस्थेच्या विश्वस्त व महिला बँकेच्या अध्यक्षा डॉ. योगिता हिरे यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन केले. शिबिरात डॉ. क्षमा अपेर, डॉ. कविता गाडेकर, डॉ. मधुरी केळकर, डॉ. वैशाली अग्रवाल, डॉ. तेजल सोनवणे, डॉ योगिता बागुल यांनी स्त्रियांच्या आरोग्याशी संबंधित सर्व समस्यांचे निराकरण व संतुलित आहारासंबंधी मार्गदर्शन केले. शिबिरात १५० विद्यार्थिनी व महिला सहभागी झाल्या. उपप्राचार्य प्रा. पी. डी. झाल्टे, पर्यवेक्षिका प्रा. सुचेता सोनवणे, सायन्स विभाग प्रमुख डॉ. टी. आर. महाले प्राध्यापिका वर्ग आणि विद्यार्थिनी यावेळी उपस्थित होते. प्रा. रंजना माळुंदे यांनी शिबिराची संकल्पना मांडली. परिचय डॉ. रेखा भदाणे यांनी करून दिला. तर आभार डॉ. रजनी पाटील यांनी मानले.

[illegible], शनिवार दि. ११ मार्च २०१७



नाशिक : [illegible]

# प्रतिकुल परिस्थितीत गांधी विचारांमुळे मिळाले समाजसाधनेचे बळ : दीक्षित

▶▶ हिरे महाविद्यालयात महात्मा गांधी विचार कार्यशाळा

। नाशिक ।

[illegible]

दै० सकाळ नाशिक दि० २८।२।१७

दै० सकाळ नाशिक दि० २८।२।१७



पंचवटी : रेणुका हिरे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ 'पालवी' या [illegible] प्रकाशन करताना 'सकाळ'चे कार्यकारी संपादक श्रीमंत माने, [illegible] प्राचार्य डॉ. बापूसाहेब जगदाळे, उपप्राचार्य डॉ. मृणाल भारद्वाज, प्रा. डॉ. मीनाक्षी पाटील, डॉ. टी. आर. महाले, प्रा. डॉ. किरण पिंगळे आदी.

# मातेच्या ममतेने व्हावे मातृभाषेचे संगोपन

## श्रीमंत माने : हिरे महाविद्यालयात राजभाषा दिन

सकाळ वृत्तसेवा

पंचवटी, ता. २७ : [illegible]

# सत्यजीत बच्छावला बीसीसीआयचा सर्वोत्कृष्ट गोलंदाज पुरस्कार जाहीर

। नाशिक ।

महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित लोकनेते व्यंकटरावजी हिरे महाविद्यालयाचा रणजी खेळाडू सत्यजीत बच्छाव याला सी. के. नायडू अखिल भारतीय क्रिकेट स्पर्धेत राष्ट्रीयस्तरावर सर्वाधिक विकेट घेतल्याबद्दल बीसीसीआयचा उत्कृष्ट गोलंदाज पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. सदर पुरस्कार बीसीसीआयच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभामध्ये आज दिनांक ८ मार्च रोजी बेंगलुरू येथे भारतीय संघातील दिग्गज आजी-माजी खेळाडूंच्या उपस्थितीत प्रदान करण्यात येणार आहे.

त्याच्या या यशाबद्दल महात्मा गांधी विद्यामंदीर संस्थेचे जनरल सेक्रेटरी डॉ. प्रशांत हिरे, संस्थेचे समन्वय आमदार डॉ. अपूर्व हिरे, समन्वयक अद्वय हिरे, महाविद्यालयाचे प्राचार्य व डॉ. बापूसाहेब जगदाळे, उपप्राचार्या डॉ. मृणाल भारद्वाज, क्रिडा संचालक डॉ. संतोष पवार, प्रा. रोहिणी गुजराथी, प्रा. किशोर



राजपूत, राम कुमावत विभाग प्रमुख, प्राध्यापक, आणि शिक्षकेतर कर्मचारी आदींनी शुभेच्छा देऊन अभिनंदन केले आहे. तसेच पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या

# हिरे महाविद्यालयात महिला आरोग्य शिबिराला प्रतिसाद

## १५० महिला व विद्यार्थिनींनी घेतला लाभ

प्रतिनिधी : नाशिक

[illegible]

### डॉक्टरांचे स्वागत

शिबिरासाठी निर्मल प्रेरणा सेवाभावी संस्था आणि न्यूओ केअर फार्मा यांच्या वतीने उपस्थित सर्व डॉक्टरांचे महाविद्यालयाच्या वतीने स्वागत करण्यात आले. प्रा. रंजना मालुंदे यांनी प्रास्ताविकात शिबिराची संकल्पना मांडली. सूत्रसंचालन श्रीमती घोलप व जाधव यांनी केले. परिचय डॉ. रेखा भदाणे यांनी करून दिला. डॉ. रजनी पाटील यांनी आभार मानले. विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

[illegible]

# मोडी लिपी प्रमाणपत्र वाटप

म. टा. प्रतिनिधी, नाशिक

महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित लोकनेते व्यंकटराव हिरे कॉलेजमध्ये मोडी लिपी प्रशिक्षण प्रमाणपत्र वाटप कार्यक्रम पार पडला. यावेळी गांधीवादी विचाराचे प्रणेते व समाजसेवक मुकुंद दीक्षित व प्रा. डॉ. मिलिंद वाघ उपस्थित होते.

अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना कॉलेजचे प्राचार्य डॉ. बापूसाहेब जगदाळे यांनी ऐतिहासिक कागदपत्रातील इतिहासाचा अन्वयार्थ लावताना मोडी लिपीचे महत्त्व विषद केले. या अभ्यासक्रमांतर्गत इतिहास विभागातील २५ विद्यार्थ्यांनी यशस्वीरित्या मोडी लिपी प्रशिक्षण पूर्ण केले. या अभ्यासक्रमासाठी प्रा. प्रगती मारकवार यांनी समन्वयिका म्हणून काम पाहिले. मोडी लिपी तज्ज्ञ प्रा. स्वाती वाडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला. उपप्राचार्या डॉ. मृणाल भारद्वाज, विज्ञान विभागप्रमुख डॉ. टी. आर. महाले यांचे मार्गदर्शन यावेळी लाभले. आभार प्रा. अंजली वेखंडे यांनी मानले तर सूत्रसंचालन प्रा. गोपाल मोजाड यांनी केले.

दैनिक दिव्य मराठी ८ मार्च २०१८

नाशिक ॲक्टिव्हिटी

मोफत आरोग्य शिबिर | हिरे महाविद्यालयात महिलादिनानिमित्त उपक्रम

# आरोग्य संवर्धनातूनच महिलांचे सक्षमीकरण

## डॉ. क्षमा अघोर यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी : नाशिक

रोजच्या धावपळीच्या जीवनात महिला आरोग्याकडे दुर्लक्ष करत असतात. त्यामुळे अनेक आजार उद्भवण्याची शक्यता असते. महिलांनी सक्षम होण्यासाठी आरोग्याकडे जाणीवपूर्वक लक्ष दिले पाहिजे, असे आवाहन डॉ. क्षमा अघोर यांनी केले.

[illegible]



आरोग्य शिबिरात बोलताना डॉ. क्षमा अघोर. व्यासपीठावर मान्यवर.

**योग्य पावले उचलली तरच शिबिर यशस्वी...**

डॉ. अघोर म्हणाल्या की, देशाचे भवितव्य [illegible]

[illegible]

दै. लोकसत्ता गुरु. दि. ०२/०३/२०१७

# कर्मवीरांचा सामाजिक दृष्टिकोन प्रेरणादायक

## भाऊसाहेब हिरे जयंती कार्यक्रमात डॉ. बापूसाहेब जगदाळे यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी, नाशिक

**कर्मवीर भाऊसाहेब** हिरे यांनी वंचित असलेल्या दिशा देण्याचे आणि समाजातील सर्वसामान्य घटकांना एकत्र आणण्याचे काम केले. त्यांचा सामाजिक दृष्टिकोन सर्वांसाठी प्रेरणादायक आहे, असे प्रतिपादन महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेच्या उच्च शिक्षण विभागाचे समन्वयक प्राचार्य डॉ. बापूसाहेब जगदाळे यांनी केले.



कर्मवीर भाऊसाहेब हिरे यांच्या पुतळ्याला जयंतीनिमित्त प्राचार्य डॉ. बापूसाहेब जगदाळे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. समवेत उपप्राचार्य डॉ. मृणाल भारद्वाज, डॉ. टी. आर. महाले, उपप्राचार्य प्रा. एस. जे. सोनवणे आदी.

कर्मवीर भाऊसाहेब हिरे यांच्या ११२व्या जयंतीनिमित्त महानगरपालिकेच्या नेहरू उद्यानातील कर्मवीरांच्या पुतळ्याला डॉ. जगदाळे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी मनोगत व्यक्त करताना डॉ. जगदाळे यांनी भाऊसाहेब हिरे यांच्या कार्याचा आढावा घेतला. शैक्षणिक, शेतीविषयक, सिंचन असा कुठल्याही क्षेत्रातील प्रश्न असतील तर त्या विषयावर सर्वांना सोबत घेऊन निर्णय घेण्याचे कार्य कर्मवीरांच्या माध्यमातून झाले. प्रास्ताविकात प्रा. डॉ. किरण पिंगळे यांनी जनसामान्यांच्या कल्याणासाठी भाऊसाहेबांनी कधीही आर्थिक किंवा प्रतिष्ठेचा विचार केला नाही, असे सांगितले. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. मृणाल भारद्वाज, विज्ञान विभागप्रमुख डॉ. टी. आर. महाले, उपप्राचार्य प्रा. एस. जे. सोनवणे यांसह विभागप्रमुख, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

दै. सकाळ मंगळ. दि. २८/२/१७



पंचवटी : रेणुका हिरे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ 'पालवी' या हस्तलिखिताचे प्रकाशन करताना 'सकाळ'चे कार्यकारी संपादक श्रीमंत माने. व्यासपीठावर प्राचार्य डॉ. बापूसाहेब जगदाळे, उपप्राचार्या डॉ. मृणाल भारद्वाज, प्रा.डॉ. मीनाक्षी पाटील, डॉ. टी. आर. महाले, प्रा. डॉ. किरण पिंगळे आदी.

# मातेच्या ममतेने व्हावे मातृभाषेचे संगोपन

## श्रीमंत माने : हिरे महाविद्यालयात राजभाषा दिन

सकाळ वृत्तसेवा

पंचवटी, ता. २७ : मराठी भाषेचा अभिमान प्रत्येकाने जरूर बाळगावा. त्याबरोबर विविध राज्यांतील भाषांबरोबरच स्पॅनिश, जर्मन, कोरियन इत्यादी भाषा शिकणेही गरजेचे आहे. विद्यार्थ्यांनी आपली दृष्टी वैश्विक ठेवणे गरजेचे आहे. मराठी ही जगात बोलल्या जाणाऱ्या भाषांपैकी एकोणिसावी असून, गोदातीरी राहणाऱ्यांनी तिचा अभिमान अपल्याच पाहिजे. गाथा सप्तशतीपासून जपून ठेवलेल्या मातृभाषेचे संगोपन आईच्या ममतेने व्हावे, अशी अपेक्षा 'सकाळ'च्या उत्तर महाराष्ट्र आवृत्तीचे कार्यकारी संपादक श्रीमंत माने यांनी आज केले.

महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालयात मराठी विभागातर्फे मराठी भाषा गौरव दिन साजरा झाला. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून श्री. माने बोलत होते. या वेळी रेणुका हिरे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ 'पालवी' या हस्तलिखिताचे प्रकाशन त्यांच्या हस्ते करण्यात आले. महाविद्यालयातील उदयोन्मुख कवी व विद्यार्थ्यांनी विविध विषयांना स्पर्श करणाऱ्या कवितांचे संकलन यात करण्यात आले आहे. प्राचार्य डॉ. बापूसाहेब जगदाळे अध्यक्षस्थानी होते.

श्री. माने म्हणाले, की मृत्युपंथाला लागलेल्या इतर भाषांचे पुनरुज्जीवन झाले पाहिजे. मराठी भाषा लेखनाची अतिशय प्राचीन परंपरा असून, ती जपली पाहिजे.

डॉ. जगदाळे यांनी सांगितले, की मराठी भाषेचा गौरव वाङ्मयाचा असेल तर मातृसत्ताक परंपरेला लक्षात ठेवणे गरजेचे आहे. अंशदायी शिक्षणाने माणसाचा सर्वांगीण विकास होत नाही. त्यासाठी परिपूर्ण शिक्षण मिळविण्यासाठी वाचनसंस्कृती जोपासणे अत्यंत गरजेचे आहे.

या वेळी उपप्राचार्या डॉ. मृणाल भारद्वाज, सायन्स विभागप्रमुख डॉ. टी. आर. महाले, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग आणि विद्यार्थी उपस्थित होते. प्रा. डॉ. किरण पिंगळे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. मीनाक्षी पाटील यांनी सूत्रसंचालन केले.